# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:28.09.2025** **वार:शनिवार**

---

•बीएसएनएलच्या स्वदेशी फोर जी यंत्रणेचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन,

•या स्वदेशी तंत्रज्ञानामुळं शासनाच्या सेवा गावागावात ऑनलाइन पोहोचवता येतील, मुख्यमंत्र्यांचा विश्वास

•राज्याच्या विविध जिल्ह्यांत पावसाचा जोर कायम, अतिवृष्टीमुळं मोठं नुकसान

आणि

•पंतप्रधान आज आकाशवाणीवरून करणार मन की बात

**<u>बीएसएनएल</u>**

आत्मनिर्भर भारत योजनेंतर्गत संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या '4G' तंत्रज्ञानाधारित सेवेचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ओडिशातील झारसुगुडा इथून दूरस्थ पद्धतीनं काल करण्यात आलं. फिनलँड, स्वीडन, चीन आणि दक्षिण कोरिया या चार देशांनंतर आता स्वदेशी 4जी तंत्रज्ञानाची निर्मिती करून भारत हा या क्षेत्रातील जगातला पाचवा देश ठरला आहे. या अंतर्गत बीएसएनएलच्या 92 हजार 633 मनोऱ्यांचं लोकार्पण करण्यात आलं असून, यापैकी 9 हजार 20 मनोरे महाराष्ट्रात उभारले गेले आहेत.

या '4G' नेटवर्कच्या लोकार्पणाच्या पुण्यातील कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. या नेटवर्कमुळं महाराष्ट्र शासनाच्या अकराशे ऑनलाईन सेवा गावागावात पोहोचवता येतील असं त्यांनी यावेळी बोलताना सांगितलं...

बीएसएनएलची स्वदेशी '4जी'ची यशोगाथा जगात उल्लेखनीय ठरेल, आत्मनिर्भर सशक्त भारताच्या दृष्टीनं हा क्षण अत्यंत महत्वाचा असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले तर 22 महिन्यात ही तंत्रज्ञान विकसित करून भारतानं जगात नवी ओळख निर्माण केली आहे असं केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी सांगितलं.

**इंट्रो**

सेवा आणि सुशासनाच्या मंत्राने प्रेरित केंद्र सरकार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली परिवर्तन आणि प्रगतीसाठी कार्यरत आहे. या अनुषंगानं सेवा पर्व याविशेष मालिकेत आज अटल पेन्शन योजनेद्वारे भारताच्या असंघिटत कार्यबलासाठी सामाजिक सुरक्षितता कशी भक्कम झाली आहे त्याबाबत हा वृत्तांत...

**कॅप्सूल-**

भारताचा असंघटित कार्यबलाकडे विशेष लक्ष देण्यासाठी केंद्र सरकारनं मे २०१५ मध्ये अटल पेन्शन योजना सुरु केली. प्रामुख्यानं दीर्घायुष्याशी निगडीत जोखीम आणि निवृत्तीनंतरच्या सुरक्षिततेचा अभाव या दोन आव्हानांवर ही योजना उपकारक ठरत आहे. भविष्यातील सदस्यांसाठी ही योजना कशी राहील त्याची रुपरेषा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडली आहे...(बाईट-मोदी)

निवृत्तीनंतर स्वेच्छेनं बचत करण्यास प्रोत्साहन देणाऱ्या या योजनेमध्ये सामील होण्याचे वय आणि अंशदानाच्या रक्कमेशी निगडीत पेन्शन लाभ दिले जातात. प्रामुख्यानं असंघटित क्षेत्रातील गरीब आणि वंचित कामगारांवर केंद्रित ही योजना देशातील सर्वात समावेशक आणि सुलभ सामाजिक सुरक्षितता उपक्रमांपैकी एक म्हणून उदयास आली आहे. या वर्षाच्या सुरुवातीला, पेन्शन योजनेतील सदस्य संख्या ८ कोटीपेक्षा जास्त झाली आहे आणि ४५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी त्यात  जमा झाला आहे. महिला सदस्यांची संख्या वाढून अंदाजे ४८ टक्के झाली आहे. अटल पेन्शन योजना भारताच्या सामाजिक सुरक्षा परिसंस्थेचा आधारस्तंभ म्हणून उदयास आली आहे. डिजिटल एकात्मता, महिलांचा सहभाग आणि ग्रामीण पोहोच यावर सरकारनं सतत लक्ष केंद्रित केल्यानं संपूर्ण भारतात या योजनेचा विस्तार होण्यास मदत झाली आहे.

**मनकीबात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरील मन की बात कार्यक्रमात आपले विचार मांडतील. मासिक रेडिओ कार्यक्रमाचा हा १२६ वा भाग आहे. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शन नेटवर्क, आकाशवाणी न्यूज वेबसाइट आणि न्यूजऑनएआयआर मोबाईल ॲपवर प्रसारित केला जाईल. हिंदी प्रसारणानंतर आकाशवाणी हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित करेल.

**नुकसान**

राज्यात अतिवृष्टीमुळं आतापर्यंत सुमारे 92 लाख एकरवरील पिकांचं नुकसान झालं असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल पुण्यात बातमीदारांना दिली. एकट्या सप्टेंबर महिन्यातच 53 लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर नुकसान झालं आहे. नुकसानापोटी आत्तापर्यंत बाधित शेतकऱ्यांना 2 हजार 250 कोटी रुपयांची मदत बँक खात्यावर जमा करण्यात आल्याचं भरणे यांनी सांगितलं. महसूल आणि कृषी विभागाकडून संयुक्तपणे पंचनामे करण्याचं काम सुरू असून, क्षेत्रीय स्तरावरून नुकसानाचा अहवाल प्राप्त होताच पुढील आर्थिक मदत केली जाईल, असंही ते म्हणाले.

राज्यातल्या पूरस्थितीमुळे उद्ध्वस्त झालेले संसार पुन्हा उभे करण्यासाठी सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करेल, असं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल दिलं. नांदेड  जिल्ह्यात कंधार तालुक्यात मणार धरण परिसरातल्या पूरबाधित नागरिकांशी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधताना ते बोलत होते.

लातूर जिल्ह्याच्या जळकोट तालुक्यातील बेळसांगवी गावातील अनेक नागरिकांना वाढवणा इथं स्थलांतरित करण्यात आलं आहे. सद्यस्थितीत पुराचं पाणी ओसरल्यानं गावाशी पुन्हा संपर्क स्थापित झाला असून प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

**इंट्रो**-

लातूर  जिल्ह्यात सुरू असलेल्या सततच्या पावसानं धरणांमधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू झाला असल्यानं नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहावं, असं आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी केलं आहे...

नांदेड जिल्ह्यात विष्णूपुरी प्रकल्पात मोठ्या प्रमाणात पाणी येत असल्यानं गोदावरी नदी धोक्याच्या पातळीवर वाहत आहे. नदीकाठच्या अनेक भागात पाणी शिरल्यानं अनेक कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आलं. मानार धरणातूनही पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळं कंधार तालुक्यातल्या अनेक गावांना मन्याड नदीच्या पुराचा फटका बसला आहे. जिल्हा आणि नांदेड महापालिका प्रशासन रात्रभर बचावकार्यात व्यस्त होते.

बीड जिल्ह्यात बिंदुसरा नदीला पुन्हा पूर आला असून या ठिकाणी प्रशासनाकडून उपाययोजना केल्या जात आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या भागाची कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल पाहणी केली. सीना आणि भीमा नदीला आलेल्या महापुरानं जिल्ह्यातील अनेक गावांना पाण्यानं वेढा दिला आहे. प्रशासनानं नागरिकांना काळजी घेण्याचं आवाहन केलं आहे.

नाशिक शहरात रात्री मुसळधार पाऊस झाल्यामुळं गंगापूरसह अनेक धरणातून विसर्ग वाढवण्यात आला आहे. गोदावरी नदीला पुन्हा पूर स्थिती उद्‌भवली आहे.

धाराशिव जिल्ह्यातील सहा गावांचा संपर्क तुटला होता त्यापैकी मेंढा या गावची परिस्थिती पूर्व पदावर आली आहे. परंडा तालुक्यातील 20 गावातील 3 हजारपेक्षा जास्त नागरिकांना जिल्हा प्रशासनानं स्थलांतरित केलं आहे.

परभणी जिल्ह्यात पूर परिस्थिती कायम असून पूर्णा तालुक्यातील चुडावा गावाला पाण्याचा वेढा बसला आहे. २५ कुटुंबाची निवाऱ्याची सोय एका शाळेत करण्यात आली आहे.

हिंगोली जिल्ह्यात 30 पैकी 19 मंडळात अतिवृष्टी झाली आहे. कळमनुरी तालुक्यातील डोंगरगाव पूल येथे कयाधू नदी पात्राबाहेर वाहत आहे. डोंगरगाव पूल गावाला पुराच्या पाण्याने वेढा दिला असून गावात जाणारा रस्ता बंद झाला आहे.

गडचिरोली शहरासह जिल्ह्याच्या काही भागात काल पावसाच्या हलक्या सरी पडल्या.

सातारा जिल्ह्यात संततधार पावसामुळं धरणातील पाणीपातळीत मोठी वाढ होत आहे.

कोल्हापूर आणि सांगलीमध्येही सततच्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. काही मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत.

अहिल्या नगर जिल्ह्यात काल पावसानं पुन्हा जोर धरला. जिल्ह्यातील विविध प्रकल्पांमधून मोठा विसर्ग सुरू आहे.

**पाऊसमदत**-

सोलापूरमधील श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीनं अतिवृष्टीनं बाधित शेतकऱ्यांना 51 लाख रुपयांची मदत साहित्य रुपानं करणार असल्याचे सभापती दिलीपराव माने यांनी काल जाहीर केलं.

धुळे पोलिस दलातील ५० अधिकाऱ्यांनी त्यांच्या पगारातून जमा केलेल्या २ लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी  मुख्यमंत्र्यांकडे त्यांच्या धुळे दौऱ्यावेळी सुपूर्द केला.

मराठवाड्यातील शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी आणि हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करावी, पंतप्रधानांनी पी. एम. केअर फंडातून मदत जाहीर करावी अशी मागणी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल मुंबईत पत्रकार परिषेदत केली.

**आशिया-चषक**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना आज भारत आणि पाकिस्तान दरम्यान दुबई इथं होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री ८ वाजता सामना सुरू होईल.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा तसंच विदर्भात काही ठिकाणी जोराचे वारे आणि विजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं,**

**नमस्कार.**